बृहन्मुंबई महानगरपालिका

करनिर्धारण व संकलन खाते

म.न.पा. मुद्रणालय इमारत, 546, 3 रा मजला, ना.म.जोशी मार्ग, भायखळा (प.), मुंबई-400011.

क्र.कवसं/2202/एमसी/2026-27 दि.22.09.2026

- सुचनापत्र -

जाहिरात क्र.कवसं/1917/एमसी/2024-25 दि.16.09.2024 अन्वये, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील **'निरीक्षक'** या संवर्गातील 178 रिक्त पदे भरण्यारीता ऑनलाईन परीक्षा दि.10.12.2024 रोजी महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर संपन्न झालेली आहे. सदर परीक्षेचा निकाल दि.10.03.2025 रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची निवडीच्या निकषानुसार 'सामाईक गुणवत्ता यादी' आणि उमेदवारांची शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे पडताळणी सापेक्ष 'तात्पुरती निवड यादी क्र.1' तसेच 'प्रवर्गनिहाय तात्पुरत्या निवड याद्या' दि.16.04.2025 रोजी, ‘तात्पुरती निवड यादी क्र.2’ दि.17.10.2025 रोजी, व ‘तात्पुरती निवड यादी क्र.3 दि.07.04.2026 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

तद्‌नंतर तात्पुरती निवड यादी क्र.1 व 3 मधील उमेदवार विविध कारणांमुळे अपात्र ठरल्यामुळे उपलब्ध झालेली पदे भरण्यासाठी निवडीच्या निकषानुसार तसेच इतर कागदपत्रांच्या पडताळणीसापेक्ष सामाईक गुणवत्ता यादीतील पुढील गुणवत्ताधारक उमेदवारांची **‘तात्पुरती निवड यादी क्र.4’ व अपात्र उमेदवारांची यादी** मान. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांच्या प्राप्त मंजुरीअन्वये प्रसिध्द करण्यात येत आहे.

‘तात्पुरती निवड यादी क्र.4’ मध्ये समाविष्ट असलेल्या उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहण्याबाबत पुढील सूचना ई-मेलव्दारे कळविण्यात येतील.

सही/- दि.22.09.2026
उप करनिर्धारक व संकलक (मुख्यालय)